महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३२ वा दिनांक : २०/१०/२०२४ वार : रविवार

## महाराष्ट्रात महायुती हरणार म्हणजे हरणार - अखिलेश यादवांचा दावा



**मालेगाव :** समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांची मालेगाव येथे सभा पार पडली. या सभेत अखिलेश यादव यांनी राज्यातील महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. महायुतीने कितीही प्रयत्न केले तरी आता राज्यात येऊ शकणार नाही, असे अखिलेश यादव म्हणाले. अखिलेश यादव यांची ही सभा भर पावसात पार पडली, पाऊस असला तरी देखील मोठ्या संख्येने लोक सभेला उपस्थित होते.

अखिलेश यादव म्हणाले, महायुती सरकार हरियाणातील विजयाच्या मार्गावर असल्याचे म्हणत असले तरी त्याचा काहीही उपयोग महाराष्ट्रात होणार नाही. राज्यात महाविकास आघाडीच्या सोबत समाजवादी पक्ष आहे. भारतीय जनता पक्ष हताश झाली आहे. लोकसभेत त्यांची हार झाली. त्यामुळे या निवडणुकीत जिंकण्यासाठी सर्व पर्याय ते वापरत आहेत. हरियाणामध्ये भाजप हरता हरता जिंकली आहे. असे असले तरी देखील महाराष्ट्रात महायुती हरणार म्हणजे हरणार, असे अखिलेश यादव म्हणाले.

महायुती सरकार म्हणजे महादुखी सरकार पुढे बोलताना अखिलेश यादव म्हणाले, इंडिया आघाडीने भाजपला लोकसभेत चांगली तगडी लढत दिली. भाजपने चारशे पारचा नारा दिला होता, मात्र ते बहुमतात सुद्धा आले नाहीत. असेच महायुतीचे सरकार देखील येणार नाही. महायुती सरकार म्हणजे महादुखी सरकार आहे, महाभ्रष्टाचारी सरकार आहे. महाराष्ट्र सरकार यापूर्वी रोजगार देणारे सरकार होते, आता सगळे बेरोजगार झाले आहेत.

जमीन खरेदी पार्टी म्हणून भाजपची ओळख पुढे बोलताना अखिलेश यादव म्हणाले, समाजवादी पक्ष सगळ्यांचा विचार करणारा पक्ष आहे. मॉबलिंचींग, अन्यायाविरुद्ध आम्ही लढा देणार आहोत. लोकसभेत बिल सादर केल्यावर आम्ही त्याला विरोध केला. मुस्लिमांना त्रास देण्यासाठी बिल आणले जात आहे. जमीन खरेदी पार्टी म्हणून भाजपची ओळख असल्याची टीका अखिलेश यादव यांनी केली आहे. अखिलेश यादव भाषण करत असताना वीजांचा कडकडाट झाला, यवेळी आमच्यासोबत ढगांचा आवाजही आहे. मालेगावमधून समाजवादी पक्ष लढणार आहे. मालेगावचे लोक पावसाप्रमाणे आम्हाला भरभरून मते देतील आणि भाजपला विरोध करतील.

बुलडोझर, एनकाउंटरच्या विरोधात उत्तर प्रदेशची जनता आहे. खोटे नरेटिव्ह पसरवण्याचे काम भाजप करत आहे. यांना धडा शिकवलाच पाहिजे. यासाठी आपण इंडिया आघाडी अर्थात महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन देखील यावेळी अखिलेश यादव यांनी केले आहे. दरम्यान, शान ए हिंद यांना महाविकास आघाडीच्या बाजूने समाजवादी पक्षाकडून मालेगाव मध्य विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना अटक व सुटका



**सोलापूर :** ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांना पंढरपूर पोलिसांनी धनादेश अनादर प्रकरणी अटक केली आहे. या प्रकरणी त्यांना तातडीने जिल्हा सत्र न्यायालयापुढे हजर केले असता कोर्टाने त्यांची जामिनावर सुटका केली.

यासंबंधीच्या माहितीनुसार, लक्ष्मण हाके यांची विजया infra कंपनी आहे. या कंपनीने सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन कंपनीस २०२१ साली ३ लाख रुपयांचा धनादेश दिलेला होता. तो बाऊन्स झाल्यानंतर सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन कंपनी ने ( केस नंबर stc ३९१/२०२१) लक्ष्मण हाके यांच्या विरोधात तक्रार केली होती.

या प्रकरणी कोर्टाने अजामीनपात्र वॉरंट काढले होते. त्यानुसार पोलिसांनी आज लक्ष्मण हाके यांना अटक करून पंढरपूर जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले. त्यानंतर झालेल्या संक्षिप्त सुनावणीत न्यायालयाने हाके यांची जामिनावर सुटका केली. या प्रकरणाची पुढील सुनावणी ७ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

लक्ष्मण हाके हे आपल्या अनोख्या आंदोलनामुळे नेहमी चर्चेत असतात. त्यांनी ओबीसी संघर्ष सेनेचे अध्यक्ष, ओबीसी व्हीजेएनटी जनमोर्चाचे कार्याध्यक्षपदावर काम केले आहे. तर मागील काही वर्षात अनेक ओबीसी मोर्चे आंदोलनात सक्रिय सहभागी असल्याचे दिसून आले आहे. यात पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर पोतराजच्या वेशात जाऊन लक्षवेधी आंदोलन केले होते. तर माढा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांनी महात्मा फुलेंसारखी वेशभुषा करत त्यांच्यासारखे समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले होते. लक्ष्मण हाके हे सांगोला तालुक्यातील जुजारपूर गावचे रहिवासी आहेत. पुणे विद्यापीठातून त्यांनी एमएचं शिक्षण पूर्ण केले आहे. फर्ग्युसन महाविद्यालयात काही दिवस अध्यापनाचे कामही त्यांनी केले आहे.

## ओढ्यातून वाहून आल्या ५०० च्या नोटा! : सांगली जिल्ह्यात अजब प्रकार

**सांगली :** जिल्ह्याच्या आटपाडी गावात असलेल्या एका ओढ्यातून चक्क पाचशे रुपयांच्या नोटा वाहताना दिसून आल्या आहेत. याचा व्हिडीओ देखिल व्हायरल होत आहे. ओढ्याच्या पाण्यातून पाचशे रुपयांच्या नोटा मिळवण्यासाठी नागरिक शोधाशोध करत असल्याचे देखील या व्हिडीओमध्ये दिसत आहे. आटपाडी गावातील गदिमा पार्कच्या समोरून वाहणाऱ्या ओढ्यात या नोटा वाहत आल्या होत्या.

आटपाडी गावात शनिवारचा बाजार होता. या बाजारासाठी आलेल्या लोकांना या नोटा ओढ्यात वाहताना दिसून आल्या. अनेक लोक नोटांची शोधाशोध करण्यासाठी पाण्यात हात घालून पाण्यातील कचरा बाजूला करत नोटा सापडण्याचा प्रयत्न करत होते. अनेकांना पाचशे रुपयांच्या नोटा सापडल्या देखील. यावेळी या ओढ्याजवळ लोकांनी चांगलीच गर्दी केली होती. यावेळी एका महिलेला पाचशेची नोट मिळाली व ही नोट परत करणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी जुन्या पाचशे रुपयांच्या १४ नोटा, एक हजार रुपयांची जुनी एक नोट, एकूण ८ हजार रुपयांच्या जुन्या नोटा. नवीन पाचशे रुपयांच्या ४ नोटा, पन्नास रुपयांच्या ३, १० रुपयांच्या अकरा, पाच रुपयांच्या २, आणि वीस रुपयांची १ नोट, अशा जुन्या नवीन एकूण १० हजार २९० रुपयांच्या नोटा मिळून आल्या आहेत. या नोटा पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

जुन्या नोटा बाळगल्याप्रकरणी स्पेसिफाईड बँक नोट अॅक्ट 2017 अंतर्गत अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्याची पक्रिया सुरू आहे. आरोपीचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्यात येईल, आटपाडी शहरातील नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, अफवा पसरवू नये. याबाबत माहिती मिळाल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन डेप्युटी एसपी विपुल पाटील यांनी केले आहे.

## मविआत कोणतेही मतभेद नाहीत - रमेश चेन्नीथला

**मुंबई :** महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नाहीत, विधानसभेच्या निवडणुका मविआ एकत्रच लढवणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना ठाकरे व शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्यातही वाद नाहीत. तिन्ही पक्ष मिळून जागा वाटपाची चर्चाही सुरु आहे, जागा वाटपाची ही चर्चा एक दोन दिवसात पूर्ण होईल, असे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी स्पष्ट केले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची व महाविकास आघाडीची प्रकृत्तीही उत्तम आहे असेही चेन्नीथला यांनी सांगितले.

प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी उद्धव ठाकरेंचे निवासस्थान मातोश्रीवर सकाळी भेट घेतली त्यावेळी त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते, यावेळी त्यांच्याबरोबर CWC सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, आमदार भाई जगताप, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, शिवसेना खा. संजय राऊत उपस्थित होते. त्यानंतर चेन्नीथला यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरद पवार यांचीही भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.

दुपारी टिळक भवन येथे महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, डॉ. विश्वजित कदम आदी उपस्थित होते. या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना ना पटोले म्हणाले की, महायुतीचा चेहरा कोण आहे त्यांनी जाहीर करावे असे आम्ही सातत्याने विचारत होतो पण मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्यास ते घाबरले आहेत. भ्रष्ट महायुती सरकारने महाराष्ट्र विकायला काढला असून जमिनी विकत आहेत. सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे आणि योजना दूत च्या नावाखाली जनतेच्या पैशावर हे सरकार भाजपाचा प्रचार करत आहे. काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्यानंतर योजनादूत सह सरकारने घेतलेले अनेक निर्णयही रद्द केले आहेत.

पांचज्यन या आरएएसएसच्या मुखपत्रात बाबा सिद्दीकींचा कुख्यात माफिया दाऊदशी संबंध जोडलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, दाऊद असो किंवा देशभरातील कोणताही गुन्हेगाराने भाजपात प्रवेश केला तर ते स्वच्छ होतात व संघही त्यांचे स्वागत करते. ज्यांच्याविरोधात गाडीभर पुरावे होते ते भाजपात आले, ज्यांना चक्की पिसिंग करणार होते त्यांना भाजपात घेतले त्यावर संघ काहीच बोलला नाही. भाजपा सरकारबरोबर बाबा सिद्दीकी आले, एकनाथ शिंदे आले व ते मुख्यमंत्री झाले त्यावेळी संघ का बोलला नाही. आता बाबा सिद्दीकींची हत्या झाल्यानंतर त्यांचा दाऊदशी संबंध दाखवण्याचा प्रयत्न ते का करत आहेत? राष्ट्रवादी काँग्रेसच्या नबाव मलिक यांच्यावरही भाजपाने दाऊदशी संबंध असल्याचा आरोप केला होता. त्याच नवाब मलिक यांचे मतदान भाजपाला चालते. भाजपाचे व संघाचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, असेही नाना पटोले म्हणाले.

काँग्रेसच्या वरिष्ठ निरिक्षकांची बैठक टिळक भवनमध्ये संपन्न.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या वरिष्ठ निरिक्षकांची बैठक दुपारी टिळक भवन येथे संपन्न झाली. या बैठकीत निवडणुकीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला प्रभारी रमेश चेन्नीथला, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहेलोत, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजित सिंग चन्नी, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य नसीम खान, कर्नाटकचे मंत्री जी. परमेश्वरा, एम. बी. पाटील, तेलंगाणाचे मंत्री उत्तम कुमार रेड्डी, दरासरी अनुसया सिताक्का, टि. एच. सिंग देव, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य खा. नासीर हुसेन मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड, वॉर रूमचे प्रमुख वामशी रेड्डी आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० ऑक्टोबर २०२४


## 'लाडकी बहीण योजना बंद होऊ देणार नाही': अजित पवारांचा विरोधकांवर हल्ला



**मुंबई :** 'लाडकी बहीण योजना बंद होऊ देणार नाही', असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर हल्लाबोल, केलाय. निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजनेच्या निधीत वाढ करण्याचे आश्वासन देखील अजित पवार यांनी दिले आहे. अजित पवार यांनी एका व्हिडिओद्वारे हृदयस्पर्शी संदेश देत लाडक्या बहिणींसाठी ही योजना सुरु राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी एका व्हिडिओ संदेशाद्वारे महाराष्ट्रातील महिलांचे लाडकी बहीण योजनेला दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानले आहेत. महायुती सरकारच्या माझी लाडकी बहिण योजनेच्या यशाबद्दल बोलताना अजित पवार म्हणाले की, या योजनेने महिलांना स्वावलंबी बनवून सक्षम केले आहे. या योजनेमुळे लाडक्या बहिणींना स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभे राहण्यास मदत झाली आहे, असे अजित पवार म्हणाले. आगामी विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील महिलांनी महायुतीला पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आधी या योजनेच्या व्यवहार्यतेवर आणि नंतर त्याच्या अंमलबजावणीवर विरोधकांनी सातत्याने विरोध केला आणि ही योजना अंमलात आल्यानंतर आता पैसे येत असले तरी निवडणुकीनंतर ही योजना बंद केली जाईल, असे विरोधक पसरवताय. लाडकी बहीण योजनेबद्दल सांगताना अजित पवार म्हणाले की, महिलांनी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठी पैशांचा वापर केला आहे. दुसऱ्या एका घटनेत एका महिलेने दोन महिन्यांचा हप्ता आणि स्वत:च्या बचतीतून शिवणयंत्र विकत घेतले आहे. राज्यभरात अशा अनेक महिलांच्या यशोगाथा समोर येत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अडीच कोटींहून अधिक महिलांना पाच महिन्यांचा एकूण ७५०० रुपयांचा हप्ता मिळाला आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

राज्याचे अर्थमंत्री असलेले अजित पवार यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात माझी लाडकी बहिण योजनेची घोषणा केली आणि ४६ हजार कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद केली. या योजनेअंतर्गत सरकार महिलांना १५०० रुपये देते. विरोधी पक्षातील अनेकांनी ही योजना बंद केल्याचा दावा केला असला तरी तुम्ही माझ्या मनगटावर बांधलेल्या प्रत्येक राखीची मी शपथ घेतो- मी ही योजना कधीही बंद होऊ देणार नाही, असे अजित पवार म्हणाले. निवडणुकीनंतर महायुती सरकारकडून योजनेच्या निधीत वाढ करण्यात येईल, असेही अजित पवार म्हणाले.

महिलांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानत अजित पवार म्हणाले की, 'महाराष्ट्रातील माझ्या बहिणी आगामी निवडणुकीत ही योजना संपवण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना चोख प्रत्युत्तर देतील.'

## साक्री तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा – तहसिलदाराकडे निवदेन



**साक्री :** साक्री तालुक्यात परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. त्यामुळे शेतकरी खचला असून, संपूर्ण साक्री तालुक्यात झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई द्यावी, पीक विमा मंजूर करावा, साक्री तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख विशाल देसले यांनी तहसीलदारांकडे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, यंदा सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाल्याने सर्वच भागात पीक परिस्थिती चांगली होती. त्यामुळे चांगले उत्पादन येईल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. पण परतीच्या पावसाने साक्री तालुक्याला झोडपून काढले. गेल्या तीन दिवसांपासून सतत होणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. काटवान, माळमाथा परिसरातील पश्चिम भागात झालेल्या पावसाने सोयाबीन, मका, बाजरी, कपाशीसह कांद्याच्या बियाण्यांचे नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहे. शेत रस्ते, विहिरी वाहून गेल्या असून, शेतात पाणीच पाणी साचले आहे. माळमाथा परिसरातील पेरेजपूर, सालटेक, खुडाणे, डोमकानी परिसरातील धरण फुटल्याने शेतात पाणी साचले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या वेळी जितेंद्र देसले, बाळा देवरे, निवृत्ती हिरे, प्रवीण तोरवणे आदी उपस्थित होते.






## विजया रहाटकर राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. हे महत्त्वाचे पद भूषवणाऱ्या विजया रहाटकर या पहिल्याच मराठी महिला ठरल्यात हे विशेष.

केंद्राने शुक्रवारी जारी केलेल्या एका अधिसूचनेनुसार विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्या पुढील ३ वर्षे आयोगाच्या अध्यक्षा म्हणून कामकाज सांभाळतील. या कालावधीत त्यांना केंद्रीय राज्यमंत्रीपदाचा दर्जा प्राप्त असेल. विजया रहाटकर यांनी यापूर्वी छत्रपती संभाजीनगर महापालिकेत नगरसेवक, महापौर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा, भाजपच्या राजस्थान सहप्रभारी, भाजप महिला मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, भाजप राष्ट्रीय सचिव म्हणूनही काम केले आहे. यावरून त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख चढाच राहिल्याचे स्पष्ट होते.

विजया रहाटकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी असताना विविधांगी काम केले होते. सक्षमा उपक्रमाद्वारे त्यांनी ॲसिड हल्ल्यातील पीडितांना दिलासा दिला होता. तर प्रज्ज्वला योजनेद्वारे त्यांनी केंद्रीय योजनांशी लाखो महिलांना जोडले होते. सुहिता योजनेतून महिलांना आठवड्यातील २४ तास सुरू राहणारी हेल्पलाइन उपलब्ध करून दिली होती. तसेच निर्मल वारी उपक्रमातूनही त्यांनी लाखो महिला वारकऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. याशिवाय, पोस्को सेल, ट्रिपल तलाक सेल, मानवी तस्करी विरोधी विशेष सेल, डिजिटल लिटृसी, महिला आयोग आपल्या दारी असे विविध उपक्रमही त्यांनी आपल्या कारकिर्दीत राबवले.

विजया रहाटकर यांनी आपल्या नियुक्तीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानलेत. राष्ट्रीय महिला आयोगासारख्या घटनात्मक संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मन:पूर्वक आभार. या महत्वपूर्ण जबाबदारीचे पालन मी निष्ठेने आणि समर्पणाच्या भावनेने करेन. शिक्षण, आरोग्य, सामाजिक स्थान यासारख्या वेगवेगळ्या मुद्द्यांच्या आधारे महिलांच्या क्षमतांना आणि संधींना अधिक गती देण्याचा प्रयत्न करेन. केवळ महिला सक्षमीकरण एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता, महिलांच्या नेतृत्वाखाली विकासयात्रेला चालना देण्याचा माझा प्रयत्न राहील, असे त्यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाकडे महिलांशी संबंधित प्रकरणांवर केंद्र व राज्य सरकारला सूचना, शिफारशी करण्याचा अधिकार आहे. १९९२ मध्ये एका विशेष कायद्याद्वारे महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाला सिव्हिल न्यायालयाचेही अधिकार देण्यात आलेत. महिलांच्या विकासासाठी कायदेशीर व घटनात्मक मुद्द्यांची समीक्षा करणे, महिलांच्या समस्या सोडवणे, संसदीय व विधायक शिफारशी करणे, महिलांच्या तक्रारींची दखल घेऊन त्यावर योग्य ती कारवाई करणे आदी विविधांगी कामे राष्ट्रीय महिला आयोगाला करावी लागतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० ऑक्टोबर २०२४


## महाराष्ट्राची कन्या गांधी घराण्याची सून होणार का?: काँग्रेस नेत्याच्या दाव्यामुळे चर्चेला जोर

**मुंबई :** काही दिवसांपासून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या लग्नाची बरीच चर्चा झाली आहे. राहुल गांधी आणि काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्या लग्नाबाबत सोशल मीडियावर वेगवेगळे अंदाज बांधले जात होते. प्रणिती शिंदे या महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशील कुमार शिंदे यांच्या कन्या आहेत. आता या अफवांवर सुशील कुमार शिंदे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांच्या लग्नाच्या बातम्यात चुकीच्या चर्चा होत असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. त्यांनी या सर्व अफवा असल्याचे स्पष्ट केले आहे.

शुभंकर मिश्रा यांच्या एका शोदरम्यान सुशील कुमार शिंदे म्हणाले की, माझी मुलगी प्रणिती खासदार आहे. खासदार म्हणून राहुल गांधींशी हस्तांदोलन केले तर काय झाले? अशा प्रकारे लग्नाच्या अफवा पसरवणे चुकीचे आहे. त्यांच्या लग्नाबद्दल कोणतीही चर्चा नाही. सुशील कुमार शिंदे यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेतली आहे. त्यांचा राजकीय वारसा त्यांनी कन्या प्रणिती यांच्याकडे सोपवला आहे.

प्रणिती शिंदे लोकसभा निवडणुकीत विजयी

९ डिसेंबर १९८० रोजी प्रणिती शिंदे यांनी मुंबईतील सेंट झेवियर्स कॉलेजमधून पदवी प्राप्त केली आहे. याशिवाय त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या शासकीय विधी महाविद्यालयातून एलएलबी केली आहे. २००९ मध्ये प्रणिती शिंदे यांनी सोलापूर शहर मध्यमधून काँग्रेसच्या तिकिटावर पहिल्यांदा निवडणूक जिंकली होती. यानंतर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुका जिंकून हॅट्रिक केली. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेदरम्यान प्रणिती शिंदे यांच्याकडे अमरावती परिमंडळाची जबाबदारीही देण्यात आली होती. केरळ प्रदेश काँग्रेस कमिटीच्या विधानसभा निवडणुकीसाठी स्क्रीनिंग कमिटीचीही त्या भाग होत्या. तर २०२४ मध्ये प्रणिती शिंदे यांनी सोलापूरमधून खासदारकीची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेदवार राम विठ्ठल सातपुते यांचा पराभव केला. सोलापूरमधून निवडून आलेल्या त्या पहिल्या महिला खासदार आहेत.

सोशल मीडियावर अनेक चर्चा

काही दिवसांपासून प्रणिती शिंदे आणि राहुल गांधी यांच्या लग्नाची बातमी सोशल मीडियावर चर्चेत आहे. प्रणिती यांचे राहुल गांधींसोबतचे अनेक फोटोही व्हायरल होत आहेत. मात्र, त्यांचे वडील सुशील कुमार शिंदे यांनी लग्नाचे वृत्त चुकीचे असल्याचे म्हटले असून हे वृत्त फेटाळले आहे. तसेच त्यांच्या लग्नाच्या बातम्यामध्ये चुकीच्या चर्चा होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## लाडक्या बहिणी दिवाळी बोनस पासून मुकणार?

**मंबई :**मध्य प्रदेशच्या निवडणुकीत टर्निंग पॉईंट ठरलेली आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीत टर्निंग पॉईंट ठरू शकणारी लाडकी बहीण योजनेबाबत महत्वाची माहिती आली आहे. दिवाळी बोनस आणि पुढील हप्त्याची वाट पाहणाऱ्या लाडक्या बहिणींना पैसे येणार नाहीत. निवडणूक आयोगाने ही योजना तात्पुरती बंद केली आहे.

महाराष्ट्रात काही महिन्यांपूर्वी एकनाथ शिंदे सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केली होती. याद्वारे महिलांना महिन्याला दीड हजार रुपये दिले जात होते. यासाठी आतापर्यंत जवळपास २.४ कोटी महिलांना पाच महिन्यांचे पैसे मिळाले होते. यातच शिंदे सरकारने दिवाळी बोनसही जाहीर केला होता. याबरोबरच पुढील महिन्याचे पैसेही दिले जाणार होते. याची महिला वाट पाहत असताना निवडणूक आयोगाने निवडणूक काळात या योजनेचे पैसे पाठविण्यावर बंदी आणली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा केली आहे. यामुळे राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. यामुळे या काळात मतदारांना थेट प्रभावनित करणाऱ्या आर्थिक योजना बंद करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. या आदेशांनंतर महिला व बाल कल्याण विभागाने लाडकी बहीण योजनेचा पैसा रोखला आहे. यामुळे पुढील दोन महिने या योजनेचे पैसे महिलांना मिळणार नाही. यामुळे आता या महिलांना डिसेंबरच्या हप्त्याची वाट पहावी लागणार आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम यांनी सर्व विभागांना याबाबत विचारणा केली होती. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ दिला जात असल्याचे समोर आले होते. यामुळे या योजनेची विस्तृत माहिती मागविण्यात आली आहे. चार दिवसांपूर्वीच या योजनेचा पैसा रोखण्यात आल्याचे विभागाने निवडणूक आयोगाला कळविले आहे. याबाबतचे वृत्त एनबीटीने दिले आहे.

दिवाळी बोनसचे काय?

लाडक्या बहिणीला निवडणुकीच्या तोंडावर खूश करण्यासाठी शिंदे सरकारने दिवाळी बोनसची घोषणा केली होती. याद्वारे ३००० रुपयांचा बोनस दिला जाणार होता. परंतु, निवडणूक आयोगाच्या कारवाईनंतर लाडक्या बहिणीला आता हा दिवाळी बोनस मिळणार नाही. तसेच डिसेंबरमध्ये दिवाळी बोनस मिळेल की नाही याची काहीही शाश्वती नाहीय.

## मला चळवळीतून संपवण्याचा प्रयत्न : मनोज जरांगे



**जालना :** मला चळवळीतून संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी केंद्र अन् राज्यातील एका नेत्याला ताकद दिली गेली, असा आरोप शनिवारी मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी सरकारवर केला. गरज पडल्यास या नेत्यांच्या नावाची समाजापुढे चिरफाड करू, असा इशाराही त्यांनी दिला.

आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाज निर्णायक मतदान करतील. आता रणशिंग फुंकले आहे. लढाईला उतरायचे म्हणजे तलवार काढावीच लागेल, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला.ही निवडणूक लढवायची की मराठा आरक्षणाला विरोध करणारे आमदार पाडायचे याचा निर्णय उद्याच्या बैठकीत घेतला जाईल, असेही ते यावेळी म्हणाले.

मनोज जरांगे यांनी शनिवारी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी उद्या म्हणजे २० ऑक्टोबर रोजी आंतरवाली सराटीत होणाऱ्या मराठा समाजाच्या बैठकीची माहिती दिली. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत उमेदवार पाडायचे की लढायचे यासाठी उद्या समाजबांधवांची निर्णायक बैठक होईल. या बैठकीतच आम्ही सर्वांपुढे आपला निर्णय जाहीर करणार. राज्यात महायुती असो की महाविकास आघाडी, मी दोघांनाही संताजी - धनाजीसारखा पाण्यात दिसतो.

त्यांचे कोणतेही अस्त्र माझ्यावर चालत नाही. त्यामुळे त्यांना मला ठार मारावे लागेल. हाच शेवटचा मार्ग त्यांच्यापुढे उरला आहे. कारण, मी मरण पत्करेल, पण पैसा व पदाच्या आमिषासाठी फुटू शकत नाही. सत्ताधारी माझ्या जवळच्या लोकांना हाताशी धरून मला कलंक लावण्याचा प्रयत्न करत आहेत. पण या प्रकरणी लाच देणारा व घेणारा संपेल, पण मी संपणार नाही.

आगामी विधानसभा निवडणुकीत मराठा समाज निर्णायक मतदान करतील. आता आम्ही रणशिंग फुंकले आहे. लढाईला उतरायचे म्हणजे तलवार काढावीच लागेल. कारण सरकारने मराठा आरक्षणाविषयीची आमची आशा संपवून टाकली आहे. सरकारने आमच्याविरोधात खूप मोठा डाव रचला आहे. उद्याच्या बैठकीत निवडणूक लढण्याचा निर्णय झाला, तरी हरकत नाही. आमच्याकडे वेळेची कमतरता नाही. आमची गेल्या १३ महिन्यांपासून तयारी सुरू आहे.

महाविकास आघाडी व महायुतीकडेही अनेक सक्षम उमेदवार आहेत. पण त्यांना त्यांच्यातून एकाला उमेदवारी द्यायची आहे. माझ्याकडेही अनेकजण इच्छुक आहेत. पण आम्ही त्यांच्यापैकी एकाला उमेदवारी दिली तर इतर १०० इच्छुक उमेदवार ठामपणे त्याच्या मागे उभे राहतील. पण मविआ व महायुतीचे इच्छुक असे करणार नाहीत. ते वेगळा पर्याय शोधतील, असे मनोज जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे म्हणाले, मागील २०-२५ दिवसांत माझ्याविरोधात मोठा डाव रचण्यात आला आहे. या प्रकरणी केंद्र व राज्यातील एका नेत्याकडे ताकद पुरवण्यात आली आहे. त्याच्या पाठीशी कॅम्पेन होणार आहे. गरज भासली तर त्याच्या नावाची समाजापुढे चिरफाड केली जाईल. त्यांचा मला या चळवळीतून संपवण्याचा प्रयत्न आहे. उद्या काय निर्णय होईल मला माहिती नाही. पण जे काही ठरेल ते सर्वांच्या फायद्याचे असेल. गरीब सामान्य ओबीसींसह मराठा समाजाने पाहिलेले स्वप्न २०२४ मध्ये साकार होईल. त्यांच्या न्यायाचा दिवस उजडेल.

मी आतापर्यंत गाव खेड्यातील एकाही ओबीसीला दुखावले नाही. मी केवळ येवल्याच्या माणसावर बोललो. त्याच्या समाजावर एकही अवाक्षर काढले नाही, असेही मनोज जरांगे यावेळी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचा नामोल्लेख टाळत म्हणाले.

## आचारसंहितेत वादग्रस्त विधान भोवणार - आमदार संतोष बांगर यांना निवडणूक आयोगाची नोटीस



**मुंबई :** महाराष्ट्रात निवडणूक आयोगाने निवडणुकांच्या तारखा घोषित केल्या असून २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे. निवडणूक आयोगाने निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करताच राज्यात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहितेचा पहिला फटका शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांना बसला आहे.

आमदार संतोष बांगर यांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे निवडणूक आयोगाने बांगर यांना नोटीस पाठवली आहे. निवडणूक आयोगाने नोटीस पाठवल्याने संतोष बांगर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. शुक्रवारी कळमनुरी येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना आमदार संतोष बांगर यांनी मतदारांना आणण्यासाठी पैसे 'फोनपे'ने पाठवा असे विधान केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते व इच्छुक उमेदवार अजित मगर यांनी आमदार बांगर यांनी मतदारांना पैशांचे प्रलोभन दिल्याने निवडणूक आयोगाने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यानंतर निवडणूक आयोगाने आमदार संतोष बांगर यांना त्यांनी केलेल्या वक्तव्याचा खुलासा करण्यासाठी नोटीस बजावली आहे. तसेच पुढील २४ तासांत खुलासा सादर करण्याची मागणी नोटीसीमधून निवडणूक आयोगाने केली आहे.

काय म्हणाले संतोष बांगर?

या प्रकरणावर बोलताना संतोष बांगर म्हणाले, मी कोणतेही वक्तव्य केले नाही. विरोधकांनी तयार केलेली कॉपी आहे. त्यामुळे माझ्या विरोधात जे काही झाले आहे ते सर्व चुकीचे आहे. विरोधकांकडे काही काम राहिले नाही. आपल्याला निवडणूक आयोगाकडून नोटीस आलेली नाही. नोटीस आल्यावर सुद्धा हाच खुलासा करणार असल्याचे संतोष बांगर म्हणाले आहेत. तसेच मला 'फोन पे'चा अर्थ मला माहीत नाही. 'गुगल पे' सुद्धा मला माहीत नसल्याचे संतोष बांगर म्हणाले आहेत.

दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणूक तोंडावर आलेली असतानाच भाजप मतांची फेरफार करत असल्याचा आरोप महाविकास आघाडीने केला आहे. काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महायुती तसेच भाजप पक्षावर जोरदार हल्ला करत गंभीर आरोप केले आहेत. राज्यातील १५० मतदारसंघात घोळ सुरू आहे. हरण्याच्या भीतीने भाजप मतांची फेरफार करत असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाचे सीईओ चोकलिंगम यांना याबाबत पत्राद्वारे तक्रार देखील दिली असल्याची माहिती नाना पटोले यांनी दिली आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० ऑक्टोबर २०२४


## जयभवानी महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा - सलग पाच तास वाचन उपक्रम





**पाटोदा** (प्रतिनिधी) पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक १५ऑक्टोबर २०२४ रोजी भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती निमित्ताने महाविद्यालयात सलग 'पाच तास वाचन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय विभागातील मा.श्री.प्रतापराव हातोटे तसेच अंतर्गत मुल्यमापन समितीचे प्रमुख प्रा विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे यांनी प्रास्ताविका मध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. त्या म्हणाल्या की, एक चांगलं पुस्तक हजार मित्रा इतकं महत्त्वाचं असतं आणि एक चांगला मित्र एका ग्रंथालयाइतका मोठा असतो. म्हणून लहानपणीच वाचनाची गोडी लागली की काही गुण अंगी येऊ लागतात. त्यासाठी ग्रंथालयाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लागावी या हेतूने सलग 'पाच तास वाचन' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री प्रतापराव हातोटे यांनी असे प्रतिपादन केले की, तुम्हाला सूर्यासारखे चमकायचे असेल तर आधी सूर्यासारखे तळपायाची तयारी ठेवा. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने वाचन केले पाहिजे. वाचनाने जीवन समृद्ध होते. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, स्वप्न ते नव्हे जे झोपल्या नंतर पडते तर खरे स्वप्न ते असते जे तुम्हाला पूर्ण केल्याशिवाय झोपूच देत नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी वाचन केले पाहिजे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. शिवाजी काकडे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

## आता मंदिराचे पावित्र्य राखून ठेवणे देखील तितकेच महत्त्वाचे! निवृत्ती महाराज इंदुरीकर



**औराळा (अक्षय चव्हाण) :** अनेक गावा-गावात कोटी कोटी रुपयांची मंदिर बांधली आहेत. मात्र, आजही त्या मंदिरात दिवा लावला जात नाही. आज आपण प्रभू श्रीराम, गुरुदेव दत्त, गणपती, भगवान श्रीकृष्ण, संत तुकाराम महाराज, शनिदेव महाराज या मूर्ती आपण बसवल्या आनंदाची गोष्ट आहे, परंतु या मंदिरांचे पावित्र्य राखणे देखील तितकेच महत्त्वाचे असल्याचा उपदेश निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी शुक्रवारी केला.

तालुक्यातील औराळा येथील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून बांधलेल्या मंदिरात देव-देवतांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या आयोजित सोहळ्याची सांगता निवृत्ती महाराज इंदोरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यावेळी इंदोरीकर महाराज बोलत होते. पुढे बोलताना महाराज म्हणाले की, मंदिर उघडण्याची विशिष्ट वेळ ठेवा, २४ - तास मंदिर उघडे नको. मंदिर पहाटे पाच वाजता उघडा आणि सकाळी दहानंतर बंद करावे. सायंकाळी पाचला उघडा आणि रात्री आठ वाजता बंद करावे. मंदिर कधीही झाकलेले असावे. आज तुम्ही प्राणप्रतिष्ठा केली आहे. त्या मूर्तीत आता चैतन्य निर्माण झाले. आणि ते चैतन्य गावाला पोषक असते. राजकारणी - मंडळींनी तुम्ही राजकारण करा, पण गाव गावात ठेवा. आधी धर्म, दुसरे गाव एकत्र ठेवा. मोठ्या नेत्यावरुन गावात वाद कधीच घालू नका. या सोहळ्याला संजना जाधव, उद्योजक मनोज पवार, शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे, बाजार समितीचे उपसभापती जयेश बोरसे, अर्जुन नितीन पाटील व भाविकांनी सहभाग नोंदवला.

या दरम्यान मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पडला. (७००० भाविकांनी घेतला महाप्रसाद गेल्या आठ दिवसांपासून औराळ्यात सुरु असलेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या सांगता सोहळ्याला औराळा गावासह औराळी, धनगरवाडी, खामगाव, हिंगणा, विटा, गव्हाली, शेरोडी, चिंचखेडा, बिपखेडा, कविटखेडा, हसनखेडा, जवळी, कानडगाव, रोहिला, सहानगाव, निपाणी, जेहूर भाविकांनी हजेरी लावत बुंदी आणि मसाला भात या महाप्रसादाचा लाभ घेतला.)

## राजेंद्र शिंगणेंचा शरद पवार गटात प्रवेश
## बुलढण्यात काका विरूद्ध पुतणी



**बुलढाणा :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी गटातील नेते व माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी अखेर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. राजेंद्र शिंगणे यांच्या पक्षप्रवेशावेळी अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील तसेच हर्षवर्धन **पाटील** देखील उपस्थित होते. या पक्षप्रवेशावर राजेंद्र शिंगणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राजकारण आणि समाजकारणात केवळ पवारसाहेबांमुळे मोठे होण्याची संधी प्राप्त झाल्याचे मत राजेंद्र शिंगणे यांनी व्यक्त केले आहे.

राजेंद्र शिंगणे म्हणाले, १९९२-९३ पासून मी आदरणीय पवारसाहेबांबरोबर काम करत आहे. १९९५ मध्ये देखील अपक्ष आमदार म्हणून निवडून आल्यावर सातत्याने अनेक वर्ष साहेबांबरोबर काम केले. मधल्या काळात मी वर्षभर अजित पवारांसोबत होतो. पण वेळोवेळी मी सांगितले आहे की, जिल्हा बँकेच्या अनेक अडचणींमुळे मी अजित पवारांसोबत होतो. सरकारकडून मला मदत मिळाली नसती तर बँक वाचवणे मला अवघड झाले असते, म्हणून मी अजित पवारांसोबत राहण्याचा निर्णय घेतला.

पुढे बोलताना राजेंद्र शिंगणे म्हणाले, आज खऱ्या अर्थाने महाराष्ट्र वाचवण्याची गरज आहे. राजकीय सामाजिक दृष्ट्या अनेक इतर अनेक विषयांच्या दृष्टीने महाराष्ट्राला वाचवण्याची गरज आहे. आदरणीय पवार साहेबच हे काम करू शकतात यावर माझा पूर्ण विश्वास असल्याचे राजेंद्र शिंगणे म्हणाले आहेत.

राजेंद्र शिंगणे म्हणाले, आज मी पक्षात वापस येत आहे, पक्षात प्रवेश करत नाहीये. पक्ष आणि नेतृत्व जे काही सिंदखेड राजा मतदारसंघात जी जबाबदारी देण्यात येईल ती मी स्वीकारेल. मला कोणत्याही प्रकारचे आश्वासन दिले नव्हते मी स्वतःहून पक्षातून बाहेर पडलो होतो. पक्ष संघटना वाढवण्यासाठी जे नेतृत्व काम देईल ते मी करेल, असे राजेंद्र शिंगणे यांनी सांगितले आहे.

काय म्हणाल्या गायत्री शिंगणे?

दरम्यान, राजेंद्र शिंगणे यांनी पुन्हा पक्षात प्रवेश केल्यानंतर त्यांची पुतणी गायत्री शिंगणे यांनी शरद पवारांना सवाल केला आहे. शरद पवार साहेब..! निष्ठवंतांचे काय..? असा प्रश्न गायत्री यांनी उपस्थित केला आहे. गायत्री शिंगणे म्हणाल्या, कालच मी शरद पवारांची वाय बी सेंटर येथे भेट घेतली, तेव्हा त्या ठिकाणी डॉक्टर शिंगणे यांचा शरद पवार गटात प्रवेश होणार असल्याचा कुठेही सुतोवाच नव्हता. मात्र आज त्यांचा प्रवेश झाला आहे. हरकत नाही, मी सिंदखेडराजा मतदारसंघातून अपक्ष लढणारच, असा दावा देखील गायत्री यांनी केला आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002